# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक १९-०४-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक १९ एप्रिल २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.५५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला उप आयुक्त (म) श्री.उध्दव घुगे,नगर सचिव एम.ए.पठाण,तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०५. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०६. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०७. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०८. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०९. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१०. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
११. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२०. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२१. स.स.सौ.दिपाली सुनिल पाटील
२२. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२३. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२४. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२५. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२७. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२८. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
२९. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान

३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३४. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान
३५. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३६. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३७. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४१. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४२. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
४३. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४४. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनुस
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५५. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५६. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५९. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे
६१. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६२. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६४. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६५. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६६. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६८. स.स.सौ.वंदना प्रकाश खंदारे
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७२. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट

७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७५. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**<u>चर्चा :</u>**

श्री.गजानन बारवाल :स.सदस्या सौ.अनिता घोडेले यांचे वडील स्व.जनार्दन बाबाजी नाईक यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झालेले आहे त्यांना या सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : यास अनुमोदन आहे.

सौ.लता दलाल : तसेच गुजरात मध्ये एका अपघातात एकाच वेळी ४१ शालेय मुले दगावली त्यांना ही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : मराठवाडा भूमीपुत्र माजी आमदार ॲड.नारायणराव नागदकर यांचेही दु:खद निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार }
श्री.संतोष खेंडके } : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : कृपया सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी २ मिनीट स्तब्ध उभे रहावे.

याच वेळी स.सदस्या सौ.घोडेले यांचे वडील स्व.जनार्दन नाईक तसेच गुजरात मध्ये अपघातात मृत्यू झालेले ४१ विदयार्थी, तसेच माजी आमदार स्व.नारायण नागदकर या सर्वांना सभागृहाच्या वतीने २ मिनीट स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : गेल्या ७-४-२००८ रोजी स्थायी समितीच्या बैठकीत जो प्रकार झ ाला तो या महापालिकेला शोभणारा नाही.

श्री.गजानन बारवाल : हा विषय सभागृहाचा होवू शकत नाही त्यावर चर्चा करणे योग्य नाही. पोलीस विभाग बघतील.

श्री.सलीम खान : सभागृहात येवून गुंडागर्दी करीत आहे तोडफोड करीत आहे हे योग्य नाही. ज्यांनी केले कार्यवाही करावी.

मा.महापौर : हा विषय सभागृहाचा होत नाही आता विषयपत्रिकेवर यावे चर्चेला वेळ दिला जाईल.

याच वेळी सभागृहात काही स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हा पक्षाचा प्रश्न नसून आपल्या सर्वाच्या जिव्हाळयाचा व मानसिकतेचा प्रश्न आहे. त्या घटनेचा निषेध करावा.

श्री.संतोष खेंडके :काही सदस्य गोंधळ घालत आहे विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

याच वेळी सदस्यांचे मा.महापौर डायस समोर येवून मोठमोठयाने बोलणे घोषणा देणे चालू असते काहीही विषय पत्रिका सुरू करण्याबाबत घोषणा देण्यात येतात. अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**विषय क्र. १९७ :**

दिनांक १६.०२.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :माझे म्हणणे ऐकूण घ्यावे. बरेचसे नगरसेवक त्या चित्रफितीमध्ये आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :शहरात पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या व्यतिरिक्त चर्चा करायची असेल तर अगोदर विषयपत्रिका घ्यावी त्यानंतर चर्चेसाठी वेळ द्यावा.

मा.महापौर : विषयपत्रिकेला सुरूवात करीत आहोत जे काही सुचना असतील त्या ऐकूण घेतल्या जातील. आता विषयावर सुरूवात करावी.

श्री.सलीम खान : जेव्हा महत्वाच्या विषयावर बोलायचे तेव्हा मा.आयुक्त गैरहजर असतात बजेटवर चर्चा करणेसाठी ०५ मिनिटाचा अवधी द्यावा.

मा.महापौर : २१ तारखेला बजेटवर सभा आहे त्या वेळी त्यावर चर्चा करावी.

डॉ.भागवत कराड : विषय मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

श्री.संजय सिरसाट : पाणी प्रश्नावर चर्चा करावी त्यानंतर विषय पत्रिका घ्यावी.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाचे बोलणे चालू असते. काहीही एकू येत नाही.

श्री.किशनचंद तनवाणी : स.सदस्य मा.महापौरांचे आदेशाचे पालन करीत नसेल तर त्यांचे सभासदत्व रद्द करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सभागृहातील प्रत्येक सदस्यांना वेळेचे महत्व आहे. सभागृहात अवमान होवू नये नियमात तरतुद आहे त्या पुर्ण नियमाचा अधिकाराचा वापर करून जे महत्वाचे जनतेच्या जिव्हाळयाचे प्रश्न असतील त्यावर चर्चा झाली पाहिजे. सभागृह शिस्तबध्द व प्रत्येक विषयाला धरून सभागृहात चर्चा व्हावी.

**ठराव :**

दिनांक १६.०२.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १९८ :**

दिनांक १९.०३.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.१६८च्या संदर्भात झालेल्या निर्णयाप्रमाणे

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सन २००६-०७ वर्षासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेने तयार केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७-(अ) नुसार पर्यावरण अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

करीता पर्यावरण अहवाल २००६-०७ मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : पर्यावरणासाठी बजेटमध्ये तरतूद ठेवण्यात येते आतापर्यत कोणकोणती कामे केली उदयान अधिक्षक यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : पर्यावणाचा समतोल राखण्यासाठी महापालिका निश्चित प्रयत्न करते. या अहवालात ज्या बाबी उल्लेखित केल्या आहे महपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली त्यावर आधारीत ही माहिती असावी असे माझे मत आहे. त्यानुसार पान क्र. ६ वर उद्यानक्षेत्र नावाचा विषय त्यात ४५ उद्यानाची नावे दिली पर्यावरण चांगले असण्यासाठी उद्यान विकसीत करणे,वृक्ष लावणे त्याचे संगोपण करणे यामुळे पर्यावणाचा समतोल राहील या उद्देशाने यात दिले यापेक्षा शहरात तीन पट उद्याने असतील असे वाटते. मी सभापती असतांना शहरातील ५५ उद्यानांचा विकास करण्यासाठी व पाच वर्ष त्यांचे संगोपण करण्यासाठी एका संस्थेला काम दिले होते त्यासाठी १४ लक्षची तरतूद करून दिली होती. त्यात ही सर्व उद्याने असेल मी ज्या भागात स्थायीक आहे त्या भागातील चार उद्यान मध्ये गेल्या दोन वर्षात संबंधीत एजन्सीचे कोणतेही काम केल्याचे दिसून येत नाही. महापालिकेची ही काम करण्याची पध्दत असेल तर या शहराचे पर्यावरण धोक्यात जाईल. मागिल दोन वर्षात उद्यान संवर्धनासाठी ५५ जागासाठी १.२५ लक्ष दिले त्यात कोणकोणती कामे केली.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रत्येक वर्षी शहराचा सर्वे करून त्यावर केलेल्या उपाय योजना सह पर्यावरणाचा अहवाल शासनास पाठविणे आवश्यक आहे. परंतु जी काळजी महापालिकेने घ्यायला पाहिजे ती अनेक वर्षापासून घेतलेली नाही. पर्यावरण संबधीत उद्यान विभाग आहे उद्यान विकसीत करणेकडे महापालिकेने लक्ष दिले नाही. त्या विभागाकडून माहिती घेतली असता इतर महानगरपालिकेत यासाठी स्वतंत्र विभाग आहे. त्या विभागातील कर्मचारी अधिकारी यांना जो अधिकार पाहिजे तो नाही. एक उद्यान अधिक्षक पाच वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखी खाली काम करतात हा विभाग सक्षम अशा एकाच अधिकाऱ्याकडे सर्व अधिकारासह द्यायला पाहिजे. याकडे प्रशासनाचे जाणीपुर्वक दुर्लक्ष आहे अशी शंका येते. बजेट कोणत्या विभागातर्फे ठेवावा.

काम करण्यासाठी कर्मचारी नाही. बजेट नसते बजेट ठेवले तरी कोणत्या विभागाकडून काम करून घ्यायचे असा प्रश्न येतो. वृक्षारोपण असेल किंवा उद्यानातील जे काम थोडेफार झाले ते निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे. सिडकोतील उद्याने पुर्वी प्रमाणे आता राहिलेली नाही दयनीय अवस्था आहे. सिडकोत प्रत्येक भागात उद्यान आहेत ते आता सध्या चांगले राहिलेले नाही. असे होत असेल तर त्यामुळे जे प्रदुषण रोखावयास पाहिजे ते रोखले जात नाही. काम करण्यासाठी कर्मचारी नाही बजेट प्रोव्हीजन नसते ठेवली तरी कोणत्या विभागाकडून काम करून घ्यायचे असा प्रश्न येतो. वृक्षारोपण असेल उद्यानामधील काम असेल ते झालेलेच नाही जे झाले ते निष्कृष्ठ दर्जाचे झ ालेले आहे. सिडकोत प्रत्येक सेक्टरला उद्यान आहे. त्याची अवस्था सध्या कामच होत नाही म्हणून वाईट आहे. झाडे उद्यान नसेल तर प्रदुषण रोखले जात नाही. शहरात चार पाच मोठे नाले वाहतात त्यात गाळ व घाणीचे मोठे साम्राज्य झालेले आहे. अनेक वेळा निविदा काढल्या काम होत नाही.

जलनिस्सारण वाहिन्यातून पावसाचे व वर्षभरातील नाल्यातून वाहून न जाणारे पाणी १२ महिने नाल्यातुन वाहते.

श्री.रेणुकादास वैद्य :पर्यावरण हा गंभीरविषय आहे. जे सेक्टर पर्यावरणाच्या निगडीत आहे. त्या एक एक विषयावर चर्चा व्हावी. जेणे करून महापालिकेला सक्षमतेने कार्यवाही करता येईल. अगोदर उद्यान विषय घ्यावा अशी विनंती आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :पर्यावरण चांगले रहावे त्यासाठी चार ते पाच स्त्रोत आहे. उद्यानावर चर्चा केली नंतर जलनिस्सारण बाबत चर्चा करता येईल. उद्यान विषयक मी माझे मत मांडले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जी लिस्ट आली ती जुन्या शहरातील आहे सिडकोचे एखादे उद्यान सोडले तर उर्वरीत यात आले नाही. सिडकोच्या उद्यानाची हस्तांतरण झाल्यापासून जी पुर्वीची अवस्था होती ती राहिलेली नाही. शहरातील स्वच्छता व उद्याने विकसीत करणे यासाठी गरजेचे असून तो पर्यावरणाच्या दृष्टीने खरा आत्मा आहे. शहरात बाहेरील येणारा पर्यटकाचे पहिल्यांदा प्रदर्शन उद्यानावर होते. उद्यान विभाग हा प्रशासनाने व पदाधिकारी मिळून सक्षम करावा संबधीतास अधिकार दयावे. उद्यान विकसीत करून मेंन्टनन्स केल्यास पर्यावरणाचा जो प्रश्न आहे तो २५ ते ३० टक्के सहज पणे सॉल होवू शकेल. देखभाल दुरूस्ती संबंधी नियोजन नाही. ६ महिन्यानंतर खेळणी, विद्युत दिवे नसतात विभागाला बळकट करावे. काम करून घ्यावे.

श्री.गजानन बारवाल :हा अहवाल बघीतला असता तो अतिशय गंभीर आहे असे वाटते. प्रदुषण नियंत्रण बोर्ड वर काम करतांना हा विषय अतिशय गंभीरतेने घ्यावा लागेल आताच स.सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे शहरातील सर्व उद्यानाची दुरावस्था झाली हे सत्य आहे परवानगी देतांना ज्या-ज्या ठिकाणी झाडे लावण्याचे निर्देश दिले व ज्या ठिकाणी झाडे तोडली जातात त्या ठिकाणी दुसरे झाड लावण्याचे सक्तीचे केले परंतू तसे झाडे लावण्याचे काम दिसून येत नाही. रस्त्याच्या कडेला असलेली झाडे तोडण्याची परवानगी दिली तेथे नवीन झाडे लावणार होते ती लावली नाही. तसेच ज्या-ज्या खाजगी संस्थांना किंवा एनजी ओजना सांगितले होते रस्त्याने कुठेही झाडे असल्याचे दिसून येत नाही. अनेक उद्यान मध्ये पाणीच नाही. हर्सुल स्मृतीवन उद्यानाची अवस्था दयनीय आहे. बकाल झालेले आहे. नागरीकांकडून मोठया प्रमाणात पैसा घेतला तसेच हर्सुल तलावात मोठे प्रमाणात पाणी असतांना त्या उद्यानाची दखल घेतली जात नाही. जी-जी उद्यानाची मोठी ठिकाणे आहेत तेथे झाडांचे संगोपण करावे व बांधकाम परवानगी देतांना झाडे लावण्याबाबत सर्वांना सक्ती करावी. यामूळे पर्यावरण चांगले राहू शकते. याची गंभीर दखल घ्यावी.

सौ.लता दलाल :काबरा उद्यान नसून राजकुंवर कांबरा उद्यान आहे अशी दुरूस्ती करावी. उद्यानाची यादी मोठी आहे माझे वार्डातील उद्यानाची जी अवस्था आहे तीच शहरातील उद्यानाची असेल असे वाटते. उद्यान विकसीत करण्यासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाते तो सर्वच निधी खर्च होतो का होत नसेल तर का झाला नाही. याची चौकशी होत नाही ती होणे गरजेचे आहे. उद्यानात हिरवळ, झाडे नसेल तर पर्यावरण चांगले राहणार नाही. हैद्राबाद, बंगलोर, नागपूर अशा मोठमोठया शहरात रस्त्याच्या दुभाजकामध्ये झाडे लावण्याचे

काम महापालिकेने केलेले असून या महापालिकेने का केले नाही ते केल्यास पर्यावरण चांगले राहू शकते. दोन तीन प्रकारे प्रदुषण होते जसे ध्वनी,वायु,जलप्रदुषण नियंत्रणात का येत नाही उद्याना संबंधी सविस्तर माहिती द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:उद्यानवर लाखो रू.खर्च होतो परंतु तेथे देखरेख करण्यासाठी कुणीतरी कर्मचारी नसतो सुरक्षा रक्षक ठेवावे उद्यान वाळून चालले आहे. शहरातील नाला दुरूस्तीचे काम चालू होते ते बंद झाले आहे. नाल्याची स्वच्छता नसल्याने मच्छर तसेच डास मोठया प्रमाणात होवून त्यामुळे प्रदुषण होते. ते स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष देणेची गरज असून उद्यान विकसीत करण्यासाठी सिध्दार्थ बीओटीवर दिले जाते त्या ठिकाणी काम करणाराची उपस्थिती दररोज पाहिजे. इतर उद्याने बीओटीवर देवू नये. उद्यानाच्या बाजुला असलेल्या नाल्याचे काम व्हावे. हजारो वाहने तेथून जातात त्यामूळे उद्यानाची जी शोभा राहत नाही. आताच सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे उद्यान विकसीत केल्यानंतर त्यावर देखभाल दुरूस्ती करण्यासाठी बजेट ठेवले पाहिजे. परवानगी देतांना झाडे लावण्याची सक्ती ठेवावी अशी विनंती. सिडको चांगले विकसित आहे. जुने शहरात चांगले वातावरण राहावे.

सौ.अनिता घोडेले :माझे वार्डात पाच-सहा उद्यान असून माळी नसल्याने देखभाल होणे शक्य नसते त्यासाठी माळी देण्यात येवून तेथेच त्यांची राहण्याची व्यवस्था करावी.

सौ.अजरा खान :शहरातील शौच्छालयाची साफसफाई तसेच इतर ठिकाणी शहरातील कचरा व लहान गल्लीतील सर्व स्वच्छता होणे गरजेचे आहे. कचरा जास्त वेळ पडून राहू नये तेथे जनावरे एकत्र येतात त्यामुळे घाण पसरते पर्यावरणाच्या दृष्टीने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. नाल्याची साफसफाई तसेच नाल्याची खोली वाढवावयास पाहिजे. रूंदी कमी होत चालली नाले स्वच्छ व त्यांना सुरक्षित ठेवावे. ड्रेनेजचे पाणी नाल्यातून वाहते तसेच उद्यानातील झाडाचे संगोपण करणे तेथे स्वच्छता ठेवले तसेच तेथे पुरेसे झाडासाठी पाणी असावयास पाहिजे असे पर्यावरणाचे संवर्धन करू शकू.

श्री.संजय जगताप : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या बाजूला मोठे उद्यान आहे तेथे पाणी नाही त्यामूळे उद्यान चांगले राहिलेले नसून तेथे पाण्याची व एक वॉचमनची व्यवस्था करावी.

श्री.अ.रशीद खान :या इमारतीमध्ये चार झाडे देणे २ चंदनचे व २ इतर आणि बाजूच्या इमारतीमध्ये पिंपळाचे एक अशी पाच ही झाडे तोडून टाकली त्याचे बदल्यास इमारतीच्याच बाजूला झाडे लावली का? शहराचा नंतर विचार करावा. मेडीकल कॉलेजकडे जातांना लाखो रूपये फुटपाथसाठी खर्च केले त्यामध्ये झाडे लावण्यासाठी जागा सोडली, झाडे तर लावलीच नाही उलट तेथे झोपडया झाल्या असलेल्या झाडाची लहान मोठी तोड करीत आहे. अगोदर महापालिकेच्या इमारतीमध्ये झाडे लावावी नंतर जनतेला सुचवावे महापालिकेच्या अनेक इमारती झाल्या तेथे झाडे लावल्याचे दिसून येत नाही. १९७५ ला शहरातील पाच ते सात विहिरी साफ केल्या होत्या त्यास पाणी आहे ते उद्यान साठी देवू शकतो अशी व्यवस्था करावी.

श्री.अनिल जैस्वाल :हडकोतील स्वामी विवेकांनद उद्यान मधील शौच्छालयाची वाईट अवस्था झालेली आहे. या उद्यानाच्या बाजूला मोठा परीसर आहे. मोठा रस्ता असून रहदारी जास्त आहे. असे असतांना या उद्यानाकडे महापालिकेचे दुर्लक्ष का होते. या उद्यानाकडे लक्ष देण्याची गरज आहे तसेच माझे वार्डात एक चांगले उद्यान असून तेथे एक वॉचमन देण्याची कार्यवाही करावी जेणे करून संरक्षण होईल.

श्री.महेश माळवतकर पर्यावरणाच्या दृष्टीने शहरातील सर्व उद्याने चांगली झाली पाहिजे. सिडको भागात दोन वर्षातील उद्यानाची परीस्थिती चांगली आहे असे म्हणता येणार नाही. माझे वार्डात वाहतूक उद्यान आहे दोन वर्षात कुणी अधिकारी डोकावले नाही. वाहतूक उद्यान करण्याच्या मागे हाच उद्देश होता की लहान मुलाना वाहतूकीचे चार नियम समजले पाहिजे. परंतू हस्तांतरणा पासून हे वाहतूक उद्यान बंद झालेले आहे. तेथे पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही. लाईट चालू पाहिजेत, औषध फवारणी नियमीत होणे गरजचे आहे कुटूंबातील सर्वच सिध्दार्थ उद्यानात जावू शकत नाही तेथे गेल्यानंतर अनेक मच्छर असल्याचे दिसून येते. त्यामूळे नागरीकांच्या जीवनाला घातक आहे. जसे हे प्रदुषण वाढते तसे आवाजाचे वाढले आहे. बजेट मध्ये सर्व प्रोव्हीजन ठेवून सर्व उद्यान अद्यावत करावी. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था वॉचमन तसेच लाईट हे नियमीत वेळोवेळी चालू असावयास पाहिजे. ज्येष्ठ नागरीकांना बसण्याची व्यवस्था असावी. चांगल्या प्रकारची मुलांसाठी खेळणी असावी. सर्व उद्यान कशा पध्दतीने चांगली करता येईल याचा विचार केला पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :माझे वार्डात लक्ष्मीनगर भागात मोठे उद्यान असून आतापर्यत १०-१५ वेळेस झाडे लावलेली होती संरक्षित भिंत असून चार गेट लावले होते दोन चोरी झाले त्यामुळे जनावरे मध्ये येवून नासधूस करतात झ ााडांचे संवर्धन होत नाही. त्या उद्यानास गेट बसविणे व आपल्या वार्डातील जसे उद्यान विकसीत केले त्याच प्रमाणे इतर वार्डातील उद्यान विकसीत करावे. जेणे करून शहराच्या पर्यावरणास मदत होईल.

श्रीमती मेहरून्नीसा खान :नेहरूनगर भागात कटकटगेट जवळ महापालिकेची मोकळी जागा असून त्या ठिकाणी उद्यान विकसीत करण्यासाठी मागिल वर्षी बजेटमध्ये तरतूद केली होती उद्यानचे काम केले नाही ते करण्यात यावे.तसेच त्यास संरक्षित भिंत व एक वॉचमन दयावे.

श्रीमती नजमा कुरैशी :बारीकॉलनी भागात १५ वर्षा पूर्वीचे उद्यान आहे तेथे दोन चार पोलमध्ये येत आहे त्या बाबत कार्यवाही करून उद्योन विकसीत करण्याची कार्यवाही करावी.जेणे करून पर्यावरणास मदत होईल.तसेच बारीकॉलनी ते मुजीब कॉलनी पर्यंतची पाच फुट खोल असलेली गटारची साफसफाई करण्यात यावी त्यामूळे सदर भागात मोठी दुर्गंधी येते.शहराचे पर्यावरण चांगले राहण्यासाठी संपूर्ण भागात स्वच्छता असण्याची गरज आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझे वार्ड एकनाथनगरमध्ये उद्यान नाही. संजय गृहनिर्माण संस्थेमध्ये पूर्वी गार्डन होते. गार्डन जगवणेसाठी माळी पाहीजे,तर जगते. अन्यथा अर्थ नाही. एकनाथनगर भागात मोठे मैदान आहे त्या ठिकाणी उद्यान होण्याची गरज आहे.त्या संरक्षित भिंत सह इतरे सर्व सोयी सुविधा असल्यास उद्यान करण्याला महत्व असते.या भागात उद्यान केल्यास

परीसरातील बरेसचे नागरीकांना त्याचा फायदा होईल व पर्यावरणासही मदत होईल.

सौ.रजनी जोशी :झाडे तोडल्याने पर्यावरणावर परीणाम होत आहे. सिडको हस्तांतरण झाले तेंव्हा ग्रिनबेल्ट होते. त्यासाठी एक कोटी बजेट मध्ये तरतूद होती परंतू काम करण्यात आले नाही.सिडको हडकोला लागून एमआयडीसी भाग आहे ५० टक्के कारखाने बंद आहे. प्रदुषण वाढले आहे. तेथील मोठमोठी झाडे तोडली जाते त्यामुळे मोठया प्रमाणात प्रदुषण होते याकडे लक्ष देण्याची गरज आहे. माझे वार्डात एक आरक्षित उद्यान आहे २० झाडे आहेत. ते चांगले विकसीत होण्यासाठी बजेट मध्ये दोन वर्षापासून १५ लक्षची तरतूद केली जाते परंतू काम होत नाही. इ टेंडरिंगमध्ये गेले,परंतू पूढे काय झाले! पर्यावरणावर विपरीत परीणाम होणार नाही यासाठी शहरातील उद्यानातील असेल रस्त्यावरील असेल झाडाचे संगोपण झाले पाहिजे

श्रीमती जयश्री किवळेकर :पर्यावरणावर सतुंलन असेल तरच जनतेचे आरोग्य व सौदर्य राखण्यामध्ये महानगरपालिकेचे कर्तव्य समजले जाते. सिडको हस्तांतरण होवून दोन वर्ष झाले पर्यावरणाच्या दृष्टीने कोणतेही काम केले नाही ती करणे गरजेचे आहे. सर्वच सदस्य पोटतिडकीने अनेक समस्यावर चर्चा करतात सिडको हस्तांतरणाच्या वेळी महापालिकेकडे सिडकोचे २२ उद्यानचा समावेश करण्यात आता ते उद्यान वाळवंट झाले तेथे खेळणी, पाणी ग्रिनरी,लाईची व्यवस्था, कारंजे तसेच मोठे वृक्ष दिसून येत नाही वाळवंट झालेचे नजरेस येते. शहर व सिडको मिळून एकूण ७० उद्यान आहे त्यातील ६० उद्यान तरी शहरातील जनतेच्या फायदयासाठी चांगले ठेवले असते तर केलेला खर्च हा सार्थक होतो आहे असे वाटले असते. सिडकोतील एकही उद्यान चांगले नसून त्याकडे दुर्लक्ष प्रशासन करीत आहे यावर बजेट ठेवले जाते परंतू नियत्रंण नसल्यामूळे दुरावस्था होते. सिडकोतील २२ उद्यान विकसीत करण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र व्यवस्था करावी.उद्यान अधिक्षक यांना अधिकार दयावे महिला बचत गटांना प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व उद्यान विकसीत करण्यासाठी देण्यात यावे. प्रशासनाने नियोजन करून नियंत्रण ठेवावे. आज अत्यंत दुरावस्था झालेली आहे.

सौ.मेहरून्नीसा खान :सभेला मा.आयुक्त व इतर विभागाचे अधिकारी नाही सभा चालविणे योग्य आहे का?

सौ.कला बोरामणीकर :समर्थनगर बजरंग व्यायामशाळा येथे महापालिकेच्या खुल्या जागेवर उद्यान करण्याचा प्रकल्प असून त्या संदर्भात न्यायालयात वादही चालू आहे त्या संदर्भात काय कार्यवाही केली. तेथे काही प्रमाणात संरक्षित भिंतीचे ही काम झाले प्रशासनाकडे वारवांर अर्ज दिले त्या जागेचे मोजमाप करावे नगररचना विभागाकडे सक्षम अधिकारी नसल्यामूळे ते काम होत नाही. त्यामूळे अतिक्रमाण वाढते आहे दोन दिवसाच्या आत जागेचे मोजमाप करून दयावे जेणे करून तेथील उद्यानास राहिलेली भिंत पुर्ण करून विकसीत करता येईल पर्यावरणास मदत होईल.

मा.महापौर :पर्यावरण अहवालावर अनेक सदस्यांनी आपआपले विचार व्यक्त केले.उदयान महत्वाचा विभाग असून कालांतराने शहर मोठे हाते कामाचा व्याप वाढतो आहे यापूर्वीच्या बैठकीत ही या विषयावर चर्चा झाली

होती तेथील कर्मचारी संख्या वाढवावी उद्यान विभाग स्वतंत्र करण्याचे आदेशीत केले काय कार्यवाही केली उद्यान विभाग सक्षम करण्यासाठी एक प्रस्ताव आणण्याची सूचना केली होती, अदयाप प्रस्ताव का आलेला नाही याचा तसेच ५५ उद्यान विकसीत करण्यासाठी १४ लक्षची तरतूद होती त्यातून कोणती कामे केली या सोबतच इमारत परवानगी देतांना झाडे लावण्याची सुचविले जाते त्यांचे पालन होते किंवा नाही याचाही खुलासा करावा.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडकोतील २२ उद्यानासाठी स्वतंत्र विभाग करून विकसीत करण्याचे आदेशीत करावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : संबंधीत अधिकारी कोण,त्यास काय अधिकार आहेत. त्यांचेकडून माहिती घ्यावी. आपले सक्षम अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री मनमोहनसिंग ओबेरॉय : जो अधिकारी असेल, त्याला निलंबित करावे, कारणे दाखवा नोटीस द्यावी, आपले वर्चस्व राहील. संबधीत अधिकारी उशीरा का आले विचारणा करून त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सक्षम अधिका-याकडून खुलासा घ्यावा.

उप आयुक्त (प्र):पर्यावरण या विषयावर उद्यान संबधी चर्चा होत असून उद्यान अधिक्षक म्हणून श्री.भडके हे काम पहात असून सर्व उद्यानातील दुरूस्ती पाणीपुरवठा करण्याचे काम करतात तसेच उद्यानमध्ये जो विकास करायचा त्या बाबतीत कार्यकारी अभियंता श्री.पानझडे हे काम पाहतात. प्रशासकीय कन्ट्रोल उपआयुक्त (प्र.) यांचे आहे. हा अहवाल कार्य.अभियंता श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी तयार केला असून ते या बाबतीत खुलासा करतील व विकसीत करण्याच्या बाबतीत श्री.पानझडे खुलासा करतील.

मा.महापौर :या विषयावर चर्चा चालू होती तेंव्हा उद्यान अधिक्षक सभागृहात उपस्थित का नव्हते त्यांचे संबधीतही हा विषय होता.

उप आयुक्त (प्र):या विषयाच्या अंतर्गत पाच-सहा विभागाचा संबध येतो संबधीत अधिकारी यांना दुरध्वनीवरून बोलविले उशीरा सभागृहात आलेले आहे.

सौ.लता दलाल :प्रत्येक विभागास विषयपत्रिका दिली जाते असे असतांना संबधीत अधिकारी यांना फोनवरून बोलण्याची गरज का भासते.

श्री.काशिनाथ कोकाटे :उद्यान अधिक्षक यांना अधिकार आहे का याचा विचार करावा विभाग प्रमुख की त्याचे अंतर्गत येणारे खालचे अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षीत आहे काय? अधिकार देणार नाही व सभागृहात समोर आल्यानंतर उत्त्तर देण्यास टाळाटाळ करायची हे बरोबर नाही. उद्यान अधिक्षक यांचेकडे किती कर्मचारी आहे त्यांना कोणते अधिकार दिलेले आहे

श्री.रेणुकादास वैद्य :वेळ जात नाही म्हणून चर्चा होत आहे असा भाग नाही. खुलासा करण्यास कुणी तयार नसेल तर चर्चा कशासाठी करायची असा प्रश्न येतो.

सौ.लता दलाल :खुलासा करण्यास प्रशासन सक्षम नाही का तसा खुलासा करावा.

श्री.गजानन बारवाल :नगररचना विभागाकडून परवानगी देतांना काही अटी घातल्या जातात. पर्यावरण समतोल राहण्याच्या दृष्टीने त्यांचा खुलासा देण्यासाठी अधिकारी नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : विभाग प्रमुखाकडून खुलासा घ्यावा.

उप आयुक्त (प्र) :यापूर्वी खुलासा केला की उद्यान मध्ये जे विकास कामे करायची ती सर्व कार्य. अभियंता श्री. पानझडे हे पाहतात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अग्निशमन तसेच उद्यान विभाग यांना पुर्णवेळ चार्ज दयावा असे ठरले असतांना कार्यवाही होत नाही. जे अधिकारी क्वॉलिफाईड नसेल तर त्यांना चार्ज देता कसे?

मा.महापौर : का कार्यवाही केली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : सभागृहात पर्यावरण या विषयावर चर्चा होते त्यांचा खुलासा कुणी करायचा याची माहिती प्रशासनाला नाही झालेली चर्चा व्यर्थ आहे काय? सभा १० मिनिटासाठी तहकूब करून नेमके कुणी उत्तर दयायचे ते ठरवावे.

श्री.गजानन बारवाल :हा विषय स्थगित ठेवावा पुढील विषय घेण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : खुलासा करण्यासाठी अधिकारी नाही. सभा तहकूब करावी बजेटची सभा तीन दिवसानंतर आहे त्यानंतर ही सभा आयोजित करावी

मा.महापौर : या विषयावर स.सदस्यांनी पोटतिडकीने प्रश्न मांडले परंतु दूर्दैवाने याचे प्रशासनाकडून उत्तर मिळत नाही या विषयी प्रशासनाने दखल घेणे आवश्यक होते ती घेतली नाही. या विषयावरील माहिती प्रशासनाने पुन्हा पुढील बैठकीच्या वेळी व्यवस्थीत ठेवावी अनेक अधिकारी आज सभागृहात हजर नाही. सदस्य पोटतिडकिने प्रश्न मांडतात अधिकारी यांनी हजर असणे आवश्यक आहे. यापुढील सभेच्या वेळी जे अधिकारी गैरहजर असतील त्यांचेवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही केली पाहिजे ही सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबरच मा.महापौर यांनी आजची सभा तहकूब केल्याचे घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०९)

दिनांक १९.०४.२००८ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील

**प्रश्नोत्तरे**

**श्री.संतोष जेजुरकर,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र. १७ :**

जैविक कचरा संबंधी माहिती देणे बाबत.

०१. एकूण किती दवाखाने, हॉस्पीटलची नोंदणी करण्यात आली व केंव्हा?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**

**उत्तर** :

जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प अंतर्गत शहरातील एकुण हॉस्पीटल व दवाखाने यांची ६६८ शासकीय व निमशासकीय,खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांची नोंदणी करण्यात आली. सदरील जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प हा दि.०१.११.२००३ पासुन कार्यान्वित करण्यात आला असून सभासद संख्या वर्षा निहाय खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | सभासंख्या |
|---|---|
| २००२-०३ | १६ |
| २००३-०४ | ८७ |
| २००४-०५ | २७७ |
| २००५-०६ | ९८ |
| २००६-०७ | ८२ |
| २००७-०८ | १०२ |
| २००८-०९ | ०२ |
| **एकुण** | **६६८** |

०२. सदर संस्था मनपास नियमीत शुल्क अदा करतात काय व किती?

**उत्तर :**

सदरील जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प सुरू करण्यापुर्वी दि.२०.१२.२००१ मा.सर्वसाधारण सभामध्ये ठराव क्र.५३४/२ नुसार सर्वानुमते चर्चेनंतर संमत करण्यात येवून सेवा शुल्काचे दर ठरविण्यात आले. मा.सर्वसाधारण सभामध्ये दर निश्चित केल्याप्रमाणे प्रकल्प सुरू झाल्यापासून ते दि.३१.०३.२००७ पर्यंत प्रचलित दर लावण्यात येत होते. संबंधित प्रचलित दर शहारातील विविध वैद्यकीय व्यावसायिक संघटनांना दर मान्य नसल्यामुळे संबंधित काही सभासद सेवा शुल्काचा भरणा पार्ट पेमेंट मध्ये करीत होते.

दिनांक २०.०२.०७ रोजी मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.७०४ नुसार प्रचलित दर कमी करून नविन सेवा शुल्काने दर वैद्यकीय संघटनाशी चर्चा करून ठरविण्यात आल्या नंतर प्रशासकीय ठराव ठेवण्यात आला ठराव संमत झाल्यानंतर नविन सेवाशुल्काने दर दि.०१.०४.२००७ पासून लावण्यात आले. मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय संघटनेचे पदाधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी, संबंधित ठेकेदार,आरोग्य

वैद्यकीय अधिकारी, सल्लागार समितीमध्ये चर्चा होऊन दि.०१.०४.२००७ पासून सभासदाकडील सेवाशुल्काची वसुली ठेकेदारानी करावयाचे ठरले.

०३. किती हॉस्पीटल,दवाखान्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही. त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यांत येते?

**उत्तर :**

बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ नुसार जेवढे नर्सिंग होम रजिस्टर आहेत त्या सर्वांची नोंदणी आपण करून घेतली आहे. इतर खाजगी वैद्यकीय व्यावसायिक (आयुर्वेदिक,होमिओपॅथीक डेन्टल,सोनोग्राफी सेंटर,पॅथॉलॉजी,इतर जनरल प्रॅक्टीशनर व कन्सल्टंट) यांच्या नोंदणीकृत संघटना मार्फत पदाधिकारी यांना पत्र देऊन त्यांच्याकडील सर्व सभासदाची नोंदणी करून घेतली आहे. तसेच ही प्रक्रिया चालू आहे.

०४. या कार्यक्रमातंर्गत एकूण किती शुल्क आकारण्यात आले?

**उत्तर :**

सोबत जुने व नविन सेवा शुल्काची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. (मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरी नुसार)

०५. मनपा कार्यालयात एकूण किती रक्कम जमा होते?

**उत्तर :**

प्रकल्प सुरू झाल्यापासून म्हणजेच नोव्हेंबर २००३ ते जुलै २००७ पर्यंत रू.९०,३४,८५०/- मनपा कार्यालयात जमा झालेले आहे. त्यापैकी २१ टक्के रॉयल्टी मनपा फंडात जमा झालेली आहे. एप्रिल २००७ ते मार्च २००८ या काळामध्ये वसूली संबंधित ठेकेदारामार्फत केली गेली. त्यांनी वसूलीच्या २१ टक्के रॉयल्टी म्हणून रू.५,१०,३६४/- ऐवढी रक्कम मनपा फंडात जमा केलेली आहे.

०६. एकूण किती रक्कम जैविक कचरा जमा करणाऱ्या संस्थेस देण्यात येते?

**उत्तर :**

मनपा व ठेकेदार यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे ७९ टक्के रक्कम ठेकेदारास देण्यात येते.

०७. प्रत्येकी दवाखाने,हॉस्पीटल यांना प्रति महा किती शुल्क आकारण्यात येते?

**उत्तर :**

सोबत दराबाबतचा तक्ता जोडण्यात आलेला आहे.

०८. सदर संस्थेने दवाखाने,हॉस्पीटल्सची माहिती व जमा करण्यात येणारे शुल्काची पडताळणी कार्यालयामार्फत करण्यात आली होती काय?

**उत्तर :**

सर्व दवाखाने,हॉस्पीटलची नोंदणी ही मनपा आरोग्य विभागातर्फे करण्यात आली होती. नोव्हेंबर २००३ ते एप्रिल २००७ पर्यंत सर्व संस्थांचे चेक व रोख रक्कम ही उपआयुक्त,मनपा यांच्या नावे जमा होत होती. तशा सुचना वैद्यकीय संघटना मार्फत संबंधित खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना दिल्या गेल्या होत्या. २००३ ते २००६ या कालावधीमध्ये लेखापरिक्षण विभागातर्फे लेखापरिक्षण झालेले आहे. २००६-०७ या वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. तसेच २००३ ते २००७ पर्यंत लेखा परिक्षण ए.जी.नागपूर यांच्यामार्फत ही झालेले आहे. एप्रिल २००७ ते मार्च २००८ या काळात मात्र वसुली ही ठेकेदारामार्फत होते. त्याचे रेकॉर्ड तो महिन्याच्या शेवटी आरोग्य विभागास सादर करत असतो.

०९. जैविक कचऱ्याची विल्हेवाट योग्यरित्या होती काय याची पाहणी नियमीतपणे कार्यालयामार्फत केली जाते काय?

**उत्तर :**

संबंधित जैविक कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने केली जाते किंवा नाही याची पाहणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्या मार्फत केली जाते. तसेच कार्यक्रम अधिकारी व आरोग्य वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी प्रकल्पास भेट देऊन पाहणी करत असतात.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**
**(आरोग्य विभाग)**

जा.क्र.मनपाऔ/आवि/बायोमेवेप्रो/दर/२९३/०३
कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद
दिनांक १४/०२/२००३

**जाहीर सूचना**

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६६ (४२)६८,३१९,४६८ आणि २९३ अन्वये.
२. पर्यावरण (संरक्षण)कायदा १९८६ भारत सरकार अन्वये,पर्यावरण आणि मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै १९९८ व सुधारणा ०२ जुन २००२ खाली बायोमेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट ॲण्ड हॅण्डलींग)रूल्स १९९८ प्रमाणे.
३. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २० एप्रिल २००० अन्वये.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय,निमशासकीय,खाजगी,स्वयंसेवी,धर्मदायी संस्था किंवा व्यक्ती,ज्या जैविक कचरा (बायोमेडीकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व संस्था म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायीक रूग्णालय, दवाखाने, रक्तपेढी, पॅथॉलॉजी प्रयोगशाळा, विज्ञान, वैद्यकीय, पशुविद्यालय, महाविद्यालय, संशोधन संस्था,कत्तलखाने, पशुवैद्यकीय रूग्णालय, दवाखाना,मोठे तबले,कुकुट पालन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र इत्यादी सर्वधारकांना म्हणजे नियमानुसार ॲक्युपायर असे संबोधण्यात आलेले सर्वांना सूचित करण्यात येते की, जैविक कचऱ्याची विहीत शास्त्रीय पध्दतीने वरील कायदानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी सर्व ॲक्युपायर यांच्यावर बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनेक दुर्धर रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्याकरिता औरंगाबाद महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इन्सीनेटर)खाजगी तत्वावर कार्यान्वीत करण्यात आला आहे.

वरील निर्देशित केलेल्या सर्व ॲक्युपायर सदर प्रकल्पाचे अजीवन सभासदत्व शुल्क रू.५००/- (रूपये पाचशे फक्त) महानगरपालिकेच्या कार्यालयात भरून सभासद होणे बंधनकारक आहे. सदरचे सभासदत्व शुल्क स्विकारण्याची अंतिम तारीख ३१/३/२००३ आहे जे ॲक्युपायर सभासदत्व स्विकारणार नाही. त्यांनी त्यांच्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायद्यातील तरतुदीनुसार व्यक्तीगत रित्या त्याच्या मालकीच्या जागेत करावी लागेल. अन्यथा सदरील ॲक्युपायर वरील सर्व कायद्यानुसार योग्य शिक्षेस व दंडास पात्र ठरतील.

जैविक कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणीच सर्व सूयाच्या,धातुच्या भागाचा नाश करून विहीत पिशव्यामध्ये वेगळा करून भरून ठेवणे ही जबाबदारी ॲक्युपायर राहील.

वरील पध्दतीने साठवून ठेवलेला जैविक कचरा ॲक्युपायर कडून नियमितपणे स्विकारून (गोळाकरून) त्याचे परिवहन व विल्हेवाट करण्यासाठी खालील प्रमाणे सेवा शुल्क आकारण्यात येत आहे.

०१. १ ते ५० खाट असलेली सर्व रूग्णालय दररोज दर खाट
रू.४=००
(५ खाटा पर्यंत कमीत कमी दरमहा रू.५००/-)
०२. ५१ ते २०० खाटापर्यंत दररोज दर खाट
रू.३=५०
०३. २०१ ते ५०० खाटापर्यंत दररोज दर खाट
रू.३=००
०४. ५०१ ते अधिक खाट दररोज दर खाट
रू.२=५०
(वरील शुल्क रूग्णालयातील उपलब्ध
खाटाच्या संख्येवर ठरविले जाईल.रूग्ण
भरतीवर अवलंबून नाही.)
०५. सल्ला कक्ष------------ दरमहा
रू.२५०=००
०६. दवाखाना (सर्व चिकित्सा पध्दतीचे) दरमहा
रू.३५०=००
०७. दंत शल्य चिकित्सक दरमहा
रू.५५०=००
०८. पॅथॉलॉजी, प्रयोगशाळा, नेत्रपेढी,
रक्तपेढी,वीर्यपेढी/अवयव प्रत्योरपन केंद्र दरमहा
रू.५५०=००
इत्यादी.
०९. गुरांचे दवाखाने, रूग्णालय,कृत्रिम रेतन केंद्र दरमहा
रू.५५०=००
कुकुटपालन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र (डेअरी)
१०. सर्व विज्ञान विद्यालय,महाविद्यालय,संशोधन केंद्र दरमहा
रू.२५०=००
(ज्या ठिकाणी जनावरांचा उपयोग करण्यात येतो.)
११. इतर सर्व ॲक्युपायर दरमहा
रू.२५०=००

दिनांक ११/३/२००३ पर्यंत जे ॲक्युपायर सभासद होणार नाहीत त्यांचा जैविक कचरा ११/३/२००३ नंतर महानगरपालिकेतर्फे उचलला जाणार नाही. तसेच त्यांनी जैविक कचरा स्वतः निर्मुलन करीत असल्याबाबतचे ऑथरायजेशन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून घेतलेले सादर करणे आवश्यक राहील. नसता त्यांचे विरूध्द उपरोक्त नमुद कायद्यान्वये कायदेशीर करण्यात येईल. या प्रकल्पाबाबत अधिक माहितीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त**

महानगरपालिका औरंगाबाद

टिप :- सभासदत्वाचे अर्ज औरंगाबाद मनपाचे मुख्य कार्यात्य (आरोग्य विभाग) सुट्टीचे दिवस
वगळून उपलब्ध राहतील. अर्जाची किंमत रू.१०/-आहे.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**आरोग्य सेवा**

जा.क्र./मनपा/आरोग्य/०७/५०९
कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद
दिनांक २१/४/२००७

**जाहीर सूचना**

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६६ (४२)६८,३१९,४६८ आणि २९३ अन्वये.
२. पर्यावरण (संरक्षण)कायदा १९८६ भारत सरकार अन्वये, पर्यावरण आणि मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै १९९८ व सुधारणा ०२ जुन २००२ खाली बायोमेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट ॲण्ड हॅण्डलींग)रूल्स १९९८ प्रमाणे.
३. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २० एप्रिल २००० अन्वये.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय,निमशासकीय,खाजगी,स्वयंसेवी,धर्मदायी संस्था किंवा व्यक्ती,ज्या जैविक कचरा (बायोमेडीकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व संस्था म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायीक रूग्णालय, दवाखाने, रक्तपेढी, पॅथॉलॉजी प्रयोगशाळा, विज्ञान,महाविद्यालय, इत्यादी सर्वधारकांना म्हणजे नियमानुसार ॲक्युपायर असे संबोधण्यात आलेले सर्वांना सूचित करण्यात येते की, जैविक कचऱ्याची विहीत शास्त्रीय पध्दतीने वरील कायदानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी सर्व ॲक्युपायर यांच्यावर बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनेक दुर्धर रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्याकरिता औरंगाबाद महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इन्सीनेटर)खाजगी तत्वावर कार्यान्वीत करण्यात आला आहे.

वरील निर्देशित केलेल्या सर्व ॲक्युपायर सदर प्रकल्पाचे अजीवन सभासदत्व शुल्क रू.५००/- (रूपये पाचशे फक्त) महानगरपालिकेच्या कार्यालयात भरून सभासद होणे बंधनकारक आहे. सदरचे सभासदत्व शुल्क स्विकारण्याची अंतिम तारीख ३०/४/२००७ आहे जे ॲक्युपायर सभासदत्व स्विकारणार नाही. त्यांनी त्यांच्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायद्यातील तरतुदीनुसार व्यक्तीगत रित्या त्याच्या मालकीच्या जागेत करावी लागेल. अन्यथा सदरील ॲक्युपायर वरील सर्व कायद्यानुसार योग्य शिक्षेस व दंडास पात्र ठरतील.

जैविक कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणीच सर्व सूयाच्या,धातुच्या भागाचा नाश करून विहीत पिशव्यामध्ये वेगळा करून भरून ठेवणे ही जबाबदारी ॲक्युपायर राहील.

वरील पध्दतीने साठवून ठेवलेला जैविक कचरा ॲक्युपायर कडून नियमितपणे स्विकारून (गोळाकरून)त्याचे परिवहन व विल्हेवाट करण्यासाठी खालील प्रमाणे सेवा शुल्क आकारण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | १ ते ४ खाटा | रूपये ३५०/-प्रति महा | |
| ०२. | ५ ते ५० खाटापर्यंत | दररोज दर खाट | रू.३=०० |

०३. ५१ ते २०० खाटापर्यंत दररोज दर खाट रू.२=५०
०४. २०० ते ५०० खाटा दररोज दर खाट रू.२=५०
०५. ५०१ ते पुढे दररोज दर खाट रू.२=००
०६. सल्ला कक्ष दरमहा रू.१५०/-
०७. दवाखाना (सर्व चिकित्सा पध्दतीचे) दरमहा रू.१५०/-
(वर्षाचे
एकदाच पैसे भरले तर रूपये १२५/-प्रति
महाप्रमाणे)
०८. दंत शल्य चिकित्सक दरमहा रू.२५०/-
०९. पॅथॉलॉजी, प्रयोगशाळा, नेत्रपेढी,
रक्तपेढी,वीर्यपेढी/अवयव प्रत्योरपन केंद्र दरमहा रू.३५०=००
इत्यादी.
१०. सर्व विज्ञान महाविद्यालय, दरमहा रू.२५०=००

दिनांक ३०/४/२००७ पर्यंत जे ॲक्युपायर सभासद होणार नाहीत त्यांचा जैविक कचरा ३०/४/२००७ नंतर महानगरपालिकेतर्फे उचलला जाणार नाही. तसेच त्यांनी जैविक कचरा स्वतः निर्मुलन करीत असल्याबाबतचे ऑथरायजेशन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून घेतलेले सादर करणे आवश्यक राहील. नसता त्यांचे विरूध्द उपरोक्त नमुद कायद्यान्वये कायदेशीर करण्यात येईल. या प्रकल्पाबाबत अधिक माहितीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त**

महानगरपालिका औरंगाबाद

टिप :- सभासदत्वाचे अर्ज औरंगाबाद मनपाचे मुख्य कार्याल्य (आरोग्य विभाग) सुट्टीचे दिवस
वगळून उपलब्ध राहतील. अर्जाची किंमत रू.१०/-आहे.

**<u>श्री.विनायक प्रभाकर पांडे,स.पालिका सदस्य</u>**

**<u>प्रश्न क्र. १८ :</u>**

०१. सध्या आपल्या शिक्षण विभागाला शारीरीक शिक्षक किती? ते कूठल्या शाळेवर काम करतात.
०२. एक शारीरीक शिक्षकाला किती शाळा दिलेल्या आहेत?
०३. महापौर चषकातंर्गत कुठल्या स्पर्धा घेण्यात आपला व त्यावर किती खर्च झाला?
०४. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत कोण-कोणत्या शाळेत बांधकाम करण्यात आले?
०५. आपल्या महानगरपालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी कोणत्या खेळामध्ये विभागीय स्पर्धे अंतर्गत तसेच राज्य पातळीवर प्रतिनिधी केले व त्यांना प्रशिक्षण कोणत्या शारीरीक शिक्षकांनी दिले?
०१. महानगरपालिकेच्या क्रिडा विभागा अंतर्गत कुठले स्पोर्ट सेंटर चालू आहे व त्यावर कोण देखरेख करतो?
०२. शारीरीक शिक्षकांची शिबीरे चालू आहेत काय? असल्यास कूठे चालू आहेत?

**<u>उत्तर :</u>**

अप्राप्त.

**नगर सचिव,**

महानगरपालिका औरंगाबाद